# ज्ञान प्रबोधिनी

सौर फाल्गुन १९४६ चे मासिक वृत्त
सौर चैत्र १, शके १९४७
दि. २२/३/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर फाल्गुनचे मासिक वृत्त. ★

## प्रकट चिंतन

पाच वर्षांच्या खंडानंतर मासिक वृत्तात चिंतन लिहायला पुन्हा सुरुवात करत आहे. या महिन्यात प्रबोधिनीची कार्यक्षेत्रे व कार्यदिशा आणि देशात व जागतिक स्तरावर चालू असलेला विचार यासंबंधी माझे चिंतन मांडत आहे.

**शाश्वत विकास ध्येये**

संयुक्त राष्ट्र संघटनेने (युनो) २०१५ ते २०३० या काळासाठी सर्व देशांनी विकासाच्या समान ध्येयासाठी काम करावे म्हणून सतरा ध्येये ठरवली. त्यांना शाश्वत विकास ध्येये म्हणतात. ती ध्येये पाहिल्यावर शाश्वत विकास ध्येये म्हणजे निसर्गाला, समाजाला व व्यक्तींना झेपेल, पेलेल व मानवेल अशी विकासाची ध्येये असा शाश्वतचा अर्थ लक्षात येतो. विकासाची गती आणि दिशा दोन्ही झेपायला आणि मानवायला हव्यात. शाश्वत विकासाच्या या सतरा ध्येयांपैकी पाच ध्येये आंतरराष्ट्रीय संघटना आणि विविध देशांच्या सरकारांसाठी आहेत. उरलेल्या बारा ध्येयांपैकी प्रबोधिनीच्या भवितव्य लेखातील कोणती उद्दिष्टे शाश्वत विकासाच्या ध्येयांना अनुसरून आहेत? असा प्रश्न प्रबोधिनी बाहेरील व्यक्ती व प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांपैकी काही जण मधून मधून विचारत असतात.

**संघटना आणि विकास**

प्रबोधिनीच्या पहिल्या भवितव्य लेखापासून प्रबोधिनीच्या सर्व कामांची आणि कार्यदिशांची विभागणी संघटना आणि विकास अशा दोन कार्यक्षेत्रांमध्ये करत असतो. विकास या कार्यक्षेत्रात ज्या कार्यदिशा येतात त्यांची संगती शाश्वत विकासाच्या उरलेल्या बारा पैकी सात ध्येयांशी लावता येते.

शाश्वत विकासाचे ध्येय क्र. १ - दारिद्र्य निर्मूलन व ध्येय क्र. २ - भूक निवारण असे आहे. ध्येय क्र. ६ - जल सुरक्षा व ध्येय क्र. ७ - ऊर्जा सुरक्षा असे आहे. या चारी ध्येयांसाठी प्रदेशविकसन कार्यदिशेने काम करणारे विभाग काही ना काही प्रकल्प व काम करत असतात. शाश्वत विकासाचे ध्येय क्र. ३ - आरोग्य व्यवस्था सुधारणे असे आहे. २०२२-२३ ते २०३१-३२ च्या तिसऱ्या भवितव्य लेखात त्यासाठी आरोग्य कार्यदिशेने काम वाढवायचे ठरवले आहे. ध्येय क्र. ४ - शिक्षण व्यवस्था सुधारणे असे आहे. औपचारिक माध्यमिक शिक्षण, पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण विस्तार या तीन कार्यदिशांचे काम याच ध्येयासाठी सुरू आहे. शाश्वत विकासाचे ध्येय क्र. ५ - स्त्रियांचा समाजजीवनातील सहभाग वाढवणे असे आहे. स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेचे काम याच ध्येयासाठी चालू असते. अशा प्रकारे शाश्वत विकासाच्या सात ध्येयांसाठी प्रबोधिनीच्या विकास कार्यक्षेत्रातील पाच व संघटन कार्यक्षेत्रातील स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेने काम चालू असते. या ध्येयांमध्ये समावेश नसलेली संशोधन ही विकास कार्यक्षेत्रातली कार्यदिशा पण प्रबोधिनीत आहे.

**संघटना हे सूत्र बनावे**

विकासाच्या कामाला लागणारे क्षमतावान, प्रेरित, गटकार्यकुशल मनुष्यबळ संघटनेशिवाय मिळणे दुस्तर आहे. त्यासाठी समूहगुणविकसन, नेतृत्वगुणविकसन, राष्ट्रीय एकात्मता, भौगोलिक विस्तार या कार्यदिशांनी आणि संघटनाची पूर्वतयारी म्हणून उद्योजकता विकास व युवशक्ती प्रबोधन या संकल्पित कार्यदिशांनी प्रबोधिनीचे काम चालते. शाश्वत विकासाच्या ध्येयांमध्ये या दिशांनी काम करण्याचे ध्येय युनोने मांडलेले नाही. पण **संघटनेशिवाय विकास नाही व झालाच तर तो शाश्वत नाही** अशी प्रबोधिनीची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आहे.

– गिरीश श्री. बापट

**नैसर्गिक संसाधने विभाग –** पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील भट्टी (ढेबेवस्ती) तसेच सोलापूर जिल्ह्यातील भांब गावातील गवळण निवास व काळे मळा आणि रेडे-भटकीवस्ती येथे १५ हजार लि. क्षमतेच्या पाणी साठवण टाकीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. या तीनही ठिकाणी प्रामुख्याने धनगर समाज मोठ्या संख्येने आहे.

**ज्ञान प्रबोधिनी हराळी** स्त्री-शक्ती प्रबोधन विभाग : ॲनिमिया प्रकल्पात गावांमध्ये महिलांच्या मासिक बैठकी सुरू आहेत, त्याचबरोबर हिमोग्लोबिन कमी असणाऱ्या महिलांना लोहाच्या गोळ्या देणे, सर्व महिलांना (कृमी) जंताची गोळी देणे, परसबाग तयार करण्यासाठी पालेभाज्याच्या बिया देणे व मार्गदर्शन सुरू आहे.

**प्रज्ञा मानस संशोधिका–**किशोर गट क्षमता विकास प्रकल्प (मेळघाट) - मैत्री संस्थेबरोबर चालू असलेल्या प्रकल्पात मेळघाट येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी चाचणी काम झाले. नोव्हेंबर २०२४ मध्ये चाचणीकाम झालेल्या २९ मुलींना व्यक्तिशः चाचणीचा अहवाल समजावून सांगून मार्गदर्शन केले. नवीन एकूण ४४ विद्यार्थ्यांचे (२० मुली, २४ मुलगे) I-CLAAP चाचणी संच वापरून चाचणीकाम दोन सत्रांमध्ये झाले.

**कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर –** मणिपूर येथील Tamenglong येथे तीन महिन्यांचा दूरस्थ संगणक प्रशिक्षण वर्ग झाला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर तेथील अकरा विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा घेतली. त्या विद्यार्थ्यांना शिवापूर केंद्रातून बेसिक संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्या बद्दल प्रमाणपत्र देण्यात आली. त्याचा वापर करून ते सहजरित्या काम मिळवू शकतील.

**ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे :** विद्याभारती संस्था व डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित पुणे शिक्षण परिषदेत मा. प्राचार्य मिलिंद नाईक यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-माध्यमिक शिक्षण' या विषयावर बीजभाषण दिले.

## – ईश्वर चरणी समर्पिता –

ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर संस्थेच्या विश्वस्त आणि हराळी केंद्राच्या उभारणीच्या पहिल्या दिवसापासून केंद्र उभारणीत आणि विस्तारासाठी अविरत कार्य केले त्या सर्वांचा आधार असणाऱ्या मा. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांचे दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सोलापूर येथे दु:खद निधन झाले. मा. लताताई ह्या १९६७ पासून प्रबोधिनीमध्ये समर्पित वृत्तीने कार्यरत होत्या. पुण्यातील युवती विभाग, प्रज्ञा मानस संशोधिका या विभागांमध्ये तसेच प्रबोधिनीचे संचालक कै. आप्पा व कै. आण्णा यांच्या स्वीय सचिवा म्हणूनही त्यांनी समर्थपणे दीर्घकाळ काम केले. १९८९ नंतर सोलापूर व १९९५ नंतर हराळी येथे प्रबोधिनीच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.



दि. ४ मार्च रोजी हराळी मध्ये, दि. १४ मार्च रोजी पुण्यात आणि दि. १६ मार्च रोजी सोलापूर येथे श्रद्धांजली सभा झाल्या. तसेच प्रबोधिनीच्या सगळ्या केंद्रांवर आणि विभागांमधून श्रद्धांजली सभा झाल्या. आ. लताताई आपल्यात नाहीत हे स्वीकारणे अवघड होते. पुणे, सोलापूर, हराळी या प्रत्येक केंद्रावर त्यांच्या कामाचा ठसा कायम राहील. अभ्यासू वृत्ती, सगळ्यांना दिलेले प्रेम आणि जिव्हाळा याच्या आठवणी पुढे येत होत्या. प्रबोधिनीच्या अमूर्त तत्त्वज्ञानाला शब्दरूप देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यांनी लिहिलेली अर्थपूर्ण पद्य, चरित्रे आणि इतर लेखन असा अमूल्य ठेवा प्रबोधिनीकडे आहे.

पुण्यात सभेच्या सुरुवातीला गोलात बसून आठवणी सांगताना अनेकांचा गळा भरून येत होता. डोळे वाहत होते. सगळ्या कामांना आध्यात्मिक अधिष्ठान असलेले जीवन त्या जगल्या हे आठवणींमधून येत होते. अनेक सामाजिक संस्थांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध त्या-त्या संस्थेच्या प्रतिनिधींनी श्रद्धांजली वाहताना उलगडले. आ. लताताईंचा जीवनपट दाखवण्यात आला.

सोलापूरमध्ये अयोध्या राम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आणि सोलापूर प्रबोधिनीचे अध्यक्ष पू. स्वामीजी गोविंददेव गिरि यांचा दृक्-श्राव्य संदेश ऐकवण्यात आला. सोलापुरातील अनेक दिग्गज व्यक्तींनी आदरणीय लताताईंबद्दलच्या आपल्या आठवणी, भावना व्यक्त केल्या.

हराळी ग्रामस्थांच्या वतीने गावाच्या मंदिरात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. प्रातिनिधिक स्वरूपात माजी सैनिक सुरेश सूर्यवंशी व निर्मलाताई यांनी ताईंच्या आठवणी सांगितल्या. सगळीकडे जमलेले सुहृद, आप्त, विद्यार्थी, साधक वेळेचे बंधन न राहाता बोलत होते. प्रत्येकाला अगदी जवळचे आहोत असे वाटण्याइतके प्रेम, माया देणाऱ्या लताताईंची कमी नेहमीच जाणवत राहील.

**स्मृतिग्रंथासाठी लेख व फोटो देण्याचे आवाहन** – लताताईंच्या जीवनातील विविध पैलू लोकांसमोर यावेत आणि त्यातून अनेकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने आपण स्मृतिग्रंथ तयार करत आहोत. इच्छुकांनी आपले लेख व लताताईंचे फोटो (डॉक्युमेंट स्वरूपात) पाठवावेत. **संपर्क –** वा. अमोल गांगजी ९८२३८८०७८९ , amol.gangji@jnanaprabodhini.org

## ★ समावेशकता ★

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**प्रज्ञा विकास कार्यक्रम**, पुणे-पाच केंद्रे – समस्या परिहार स्पर्धा – पुणे शहरातील नागरी वस्ती भागात विविध संस्थांच्या वतीने उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमातील निवडक विद्यार्थ्यांकरिता स्पर्धेचे आयोजन सौर फाल्गुन ११ (२ मार्च) रोजी ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे करण्यात आले. तीन तासांच्या स्पर्धेत वर्गातील आवाज नियंत्रित ठेवणे या समस्येवर विद्यार्थ्यांनी ''साऊंड प्रूफ क्लासरूम'' हे मॉडेल तयार केले. एकूण सहभागी विद्यार्थी – ६०, एकूण गट -१४ (प्रज्ञा विकास कार्यक्रम, निरामय संस्था, 'स्व'-रूपवर्धिनी संस्था, कास्प)

**ज्ञानसेतू –** गणित व प्रदर्शन कार्यशाळा-सौर फाल्गुन १८ व २० (९ व ११ मार्च) रोजी सोळा महाविद्यालयातील ७१ स्वयंसेवक सहभागी झाले.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**विज्ञान, गणित व प्रदर्शन प्रात्यक्षिक –** सौर फाल्गुन २२ (१३ मार्च) रोजी महाविद्यालयातील २१ स्वयंसेवकांनी येथील १२७ विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवकाच्या तयारीसाठी प्रात्यक्षिक घेतले. सौर फाल्गुन २४ (१५ मार्च) रोजी पंधरा स्वयंसेवकांनी ११३ विद्यार्थ्यांसाठी डेमो घेतले.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ★ नवोन्मेषता ★

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**छोटे सायंटिस्टस् प्रकल्प –** 'आऊट ऑफ द बॉक्स' या कार्यशाळेमधून पुस्तकातील दुर्लक्षित असलेले विषय किंवा विद्यार्थ्यांना ज्याबद्दल खूप उत्सुकता आहे, कुतूहल आहे असे विज्ञानावर आधारित विषय त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आले.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**गणित प्रभुत्व परीक्षा –** ज्ञान प्रबोधिनी आणि पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या गणित प्रभुत्व परीक्षेसाठी १०५ शाळांमधून पाचवी मधील १४०३ आणि आठवी मधील ७९४ अशा एकूण २१९७ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. या वर्षी ३० शाळा नव्याने सहभागी झाल्या.

- **प्रेरणा सेतू –** ''Armed Forces'' या विषयावर आयोजित सत्रांचे सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी इ. ५वी प्रवेश परीक्षा सौर फाल्गुन ४ (२३ फेब्रु.) रोजी झाली. एकूण नोंदणी सुमारे १४५० झाली. पैकी १३९३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये ८२५ मुले आणि ५६८ मुली होत्या. त्यातील इंग्रजी माध्यमाची ९३१ मुले (मुले ५४४, मुली ३८७) आणि मराठी माध्यमाची ४६२ मुले (मुले २८१, मुली १८१) होती. आत्तापर्यंतची विक्रमी नोंदणी ह्या वर्षी होती. मराठी माध्यमाचीही गेल्या काही काळातील सर्वात जास्त नोंदणी होती. आर्थिक गरजू व वंचित गटांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले होते. विशेष गरजा असलेले विद्यार्थीही परीक्षेस बसले. त्यांना विशेष सुविधा जसे स्वतंत्र प्रशिक्षित परीक्षक– निरीक्षक नेमणे, स्वतंत्र वर्ग इ. देण्यात आल्या.

## ★ प्रभाव ★

**❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे - विद्याव्रत संस्कार समारंभ –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

**उमलत्या वयाशी गट –** सौर फाल्गुन १९ व २१ (१० व १२ मार्च) सेवा सहयोग या संस्थेच्या पंधरा वस्त्यांमधील २२५ महिलांसाठी ‘पालक आणि स्क्रीन टाईम’ यावर दीड तासाचे सत्र घेण्यात आले.

**औंध आणि पौड रस्ता संवादिनी –** सौर फाल्गुन १७ (८ मार्च) रोजी औंध आणि पौड रस्ता संवादिनीच्या दशकपूर्ती निमित्त शिवचैतन्य सभागृह, पौड रस्ता येथे पद्य गायन आणि प्रतिज्ञा ग्रहण असा कार्यक्रम झाला. त्यात दहा वर्षांचा आढावा घेणारे निवेदन गप्पांच्या रूपात आणि त्याला योग्य असे पद्य असा प्रयोग बारा जणींनी मिळून केला. त्यानंतर गटातल्या १३ जणींनी प्रथम प्रतिज्ञा आणि एकीने द्वितीय प्रतिज्ञा घेतली. मार्गदर्शनात मा. गिरीशरावांनी आपल्या चार पथकाधीपतींनी स्त्री शक्ती बद्दल काय मांडले आणि प्रत्यक्षात त्याची कार्यवाही कशी केली याबद्दल मांडणी केली. या कार्यक्रमाला एकूण १०० च्या आसपास उपस्थिती होती.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

महिंद्रा आणि महिंद्रा, चाकण यांच्यासाठी कंपनीमधील एकूण १५० महिला कर्मचाऱ्यांसाठी ‘यशस्विनी’ हा नव्याने तयार केलेल्या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात झाली. या प्रशिक्षणात work ethics (quality, safety, discipline, punctuality, team work, respect), POSH, grievances handling process यासाठी awareness, personal aspiration and their importantce असे विषय घेण्यात येत आहेत.

महिंद्रा आणि महिंद्रा, चाकण यांच्यासाठी कंपनीमधील कामगार आणि त्यांच्या जोडीदारासाठी ‘जोडी तुझी माझी’ या अंतर्गत ‘कुटुंब’ आरोग्य यावर प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यामध्ये ४८ जण सहभागी झाले. गुडेल कंपनी, पिरंगुट इथे "self-awareness (SWOT analysis and Jo Hari Window)' या विषयावर दोन प्रशिक्षण वर्ग झाले. यामध्ये २५ जण सहभागी झाले.

### ❖ शैक्षणिक साधन केंद्र

**प्रबोध आभासी प्रयोगशाळा :** प्रबोध AR लॅब हे ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) तंत्रज्ञानाचे एक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपयोजन आहे. या तंत्रज्ञानामुळे मुलांना स्मार्टफोनवर परस्परसंवादी दृश्यात्मक अनुभवांच्या माध्यमातून विज्ञान आणि गणितामधील संकल्पना समजून घेण्यात मदत होते.

**प्रबोध एआर लॅबसाठी केलेले काम :** ॲपसाठी संपूर्ण UI/UX डिझाईन केले. विज्ञान आणि गणितासाठी डिझाईन ॲसेट्स (UI घटक, इलस्ट्रेशन्स, पॅटर्न्स, टेक्स्चर्स) तयार केले. प्रयोगांसाठी प्रश्नमंजुषा तयार केली. UI ॲसेट्स आणि ग्राफिक्स तयार केले.

**ॲस्पायरेशनल ब्लॉक, मनकोटमध्ये व्हर्च्युअल किऑस्क/मिनी डिजिटल स्टुडिओचे उद्घाटन :** पूंछ, सौर १३ फाल्गुन (४ मार्च) : ॲस्पायरेशनल ब्लॉक मनकोट येथील माध्यमिक विद्यालय, धरती आणि माध्यमिक विद्यालय, नार बलनॉय येथे प्रत्येकी एक असे दोन व्हर्च्युअल किऑस्क भेट दिले. शिक्षणात तंत्रज्ञानाचा समावेश करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत श्री. विकास कुंडल, (आयएएस), विभागीय आयुक्त, पूंछ यांनी या दोन्ही ठिकाणी व्हर्च्युअल किऑस्क/ मिनी डिजिटल स्टुडिओचे उद्घाटन केले. या शाळेतील मुलांशी ते दूरस्थ व्हिडिओ मीटिंगमध्ये बोलले.

- **निसर्ग मित्र ऑलिंपियाड :** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ★ विभागांचे चालू कामाचे वृत्त ★

### ❖ संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

**उमलत्या वयाशी .... :** प्रमासं च्या WURTH ITAP या प्रकल्पांतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन, येरवडा व वनाझ परिवार शाळा, वनाझ या दोन शाळांमध्ये युवा साथी कार्यशाळा झाली. संख्या – एकूण १८० ‘स्व’–रूपवर्धिनीच्या नर्सिंगच्या गटासाठी सहजीवनाच्या उंबरठ्यावर याची कार्यशाळा झाली. संख्या – ५० प्रशिक्षक. प्रमासं च्या निर्धार प्रकल्पांतर्गत– महादजी शिंदे हायस्कूल, वानवडी येथे ७वी व ८वीच्या मुलांसाठी उमलत्या वयाशीची कार्यशाळा झाली. संख्या – १२५.

**संवादिनी शिरूर –** बालाजी शाळेत उमलत्या वयाशीचे सत्र पूर्ण झाले. गोलेगाव व राळेगण येथे ओळख स्पर्शाचीचे सत्र झाले. एकूण विद्यार्थी ७७५. ज्ञानगंगा, धनक, शाळेत जवळपास ३०० पालकांना मार्गदर्शन केले. डेक्कन शाळेत व बेकार्ट कंपनीत १६५ महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

**हिरकणी प्रकल्प –** हिरकणी प्रकल्पाची सुरुवात २०१३ साली झाली. दशकपूर्ती नंतर आत्तापर्यंत लाभार्थी संख्या १७८८ झाली असून ६३ मार्गदर्शक या प्रकल्पात आपापल्या ठिकाणी काम करत आहेत. बदलापूर, चिपळूण, सोलापूर या ठिकाणी प्रशिक्षक प्रशिक्षणही घेतले गेले असा हिरकणी विस्ताराचा एक टप्पा पार झाला आहे.

- **कातकरी विकास प्रकल्प** : सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, सोलापूर

**विद्याव्रताची पूर्वतयारी –** यासाठी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान विद्याव्रताच्या पाच कार्यशाळा संपन्न झाल्या. व्रतेन दीक्षाम् आप्नोति या पूर्वतयारीनंतर सुरेल व पवित्र वातावरणात मंत्रोच्चार व त्याच्या अर्थासह विद्याव्रत संस्कार कार्यक्रम संपन्न झाला. ५६ मुले, सतरा मुली आणि पाच मार्गदर्शक अशा एकूण ७८ प्रबोधकांनी विद्याव्रताची दीक्षा घेतली.

**संगारेड्डी कार्यारंभ : युवकांसाठी नेतृत्व** –तारा डिग्री कॉलेजमध्ये युवक–युवतींसाठी वर्षभर होणाऱ्या व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकसन कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. महिला कौशल्य – गरजू महिलांसाठी शिलाई प्रशिक्षण सुरू केले.

**वंचित विद्यार्थी शिक्षण –** संगारेड्डी पासून पंधरा किमी दूर असलेल्या सदाशिव पेठ या गावी पालावर राहणाऱ्या अतिशय गरीब मुलांसाठी शैक्षणिक तासिका व सकस आहार योजना सुरू केली.

### ❖ चिपळूण स्थायी संपर्क केंद्र

क्रीडाकुल ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पांतर्गत सौर फाल्गुन १५ ते १८ (६ ते ९ मार्च) या कालावधीत ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल निगडी येथे झालेल्या आंतरकेंद्रीय स्पर्धांमध्ये चिपळूण केंद्रावरून एकूण ८० मुले–मुली सहभागी झाली. सौर फाल्गुन १८ (दि. ९ मार्च) रोजी ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल निगडी तर्फे पुणे जिल्हा सब जुनिअर ॲथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेतसुद्धा चिपळूण केंद्राच्या खेळाडूंपैकी वीस खेळाडूंनी सहभाग घेतला.

चिपळूण तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, आंबडस या शाळेत हिरकणीचे पाचवे सत्र सौर फाल्गुन १४ (५ मार्च) रोजी झाले व त्याला एकूण ३० मातापालिका उपस्थित होत्या.

### ❖ डोंबिवली विस्तार केंद्र

**विज्ञान प्रदर्शन –** सौर फाल्गुन १७–१८ (८–९ मार्च) रोजी युवक–युवती विभागातर्फे कानविंदे सभागृहात सायं. ४ ते ८ या वेळेत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात प्रबोधक मंडळ व विद्याव्रत या साप्ताहिक वर्गातील इ. ५वी ते ८वीच्या एकोणिस विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग सादर केले. दोन्ही दिवशी एकूण ५०० जणांनी प्रदर्शनाला भेट दिली.

**अभिनंदन –** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सौर फाल्गुन १८ (९ मार्च) या दिवशी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे सुचेताताई वर्तक यांचा तसेच स्फूर्ती महिला सामाजिक संस्थेतर्फे स्नेहाताई गोगटे यांचा पौरोहित्य क्षेत्रातील कार्यासाठी सन्मान करण्यात आला.

### ❖ ठाणे संपर्क केंद्र

**ओळख स्पर्शाची उपक्रम** – ग्रामीण शिक्षण संस्था, अनमोल विद्यालय, महानगरपालिका शाळा क्रमांक ४३ आणि विद्या प्रसारक मंडळाचे प्राथमिक विद्यालय इत्यादी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवी या इयत्तांसाठी ओळख स्पर्शाची या उपक्रमा अंतर्गत एकूण ७५४ विद्यार्थ्यांपर्यंत पोचलो.

### ❖ बदलापूर संपर्क केंद्र

**विद्याव्रत संस्कार –** सौर फाल्गुन १५ (६ मार्च) रोजी बदलापूर गाव येथील शिशुविहार विद्यामंदिर शाळेतील ३० मुलांचा विद्याव्रत संस्कार समारंभ संपन्न झाला. सौ. सुमित्राताई यांनी विद्याव्रत संस्कारांचा हेतू, पाच विकसने, विद्यार्थ्यांनी करावयाचे संकल्प याबद्दल माहिती सांगितली. या ३० विद्यार्थ्यांपैकी सहा विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

### कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

**छोटे इंजिनिअर्स :** छोटे इंजिनिअर्स प्रकल्पामध्ये शिवगंगा माध्यमिक विद्यालय, कोंढणपूर व कल्याण माध्यमिक विद्यालय, कल्याण या शाळेतील विद्यार्थ्यांना प्लंबिंगसाठी लागणाऱ्या साहित्याची व हत्यारांची ओळख करून दिली. तसेच गळणाऱ्या नळाला कसे दुरुस्त करावे याचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांकडून ते करवून घेतले.

### ❖ नैसर्गिक संसाधने विभाग

नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील सावर्णा (मंदिर) व सावर्णा (रस्ता) आणि माळेगाव ग्राम पंचायतीतील निशाणखडक व जांभूळपाडा या दोन ठिकाणी मिळून पंधरा हजार लिटर क्षमतेच्या चार पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. याशिवाय सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यातील पारंबे गावातील वीस हजार लीटर क्षमतेच्या टाकीचे बांधकामही ग्रामस्थांच्या सहभागातून नुकतेच पूर्ण करण्यात आले. या सर्व आठही ठिकाणी साठवण टाकीचा सळईचा सांगाडा बांधण्यात व सांगाड्यावर सिमेंटचा माल लिंपण्यात स्थानिक ग्रामस्थांनी चांगल्याप्रकारे श्रमकार्य केले.

**अभिनंदन** – पुण्यातील फेरोसिमेंट सोसायटीतर्फे खोपडेवाडी (ता. वेल्हे) येथील बापू जोरकर यांना ‘व्ही. डी. जोशी फेरोसिमेंट उत्कृष्ट

कारागिर' हा पुरस्कार फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष पद्माकर लेले यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व दीड हजार रुपये असे होते. प्रबोधिनीतर्फे लोकसहभागातून ग्रामीण भागात बांधलेल्या अंदाजे पंधरा सार्वजनिक पाणीसाठवण टाक्यांमध्ये बापू जोरकर याने सक्रीय योगदान दिले आहे.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

विविध चाचण्यांचे भारतीय भाषांमध्ये व वेब वर उपलब्धतता करून देण्याचे काम चालू आहे. रचना अभिक्षमता iSpring software द्वारे MOODLE वर तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. आता सर्व उपचाचण्यांचे फॉर्म्स सिस्टिम मध्ये बनवून तयार झाले आहेत. 'मनशोध' चाचणी हिंदी मध्ये करण्याचे काम सुरू आहे. 'नाते लग्नाचे' चाचणी short version training साठी वापरण्याकरिता मानव संसाधन विभागासाठी तयार केली आहे; 'Pre-Marital test - स्वप्न सहजीवनाचे' या चाचणीचे digitization चे काम सुरू केले आहे. "Myself in a group (MIG)' या चाचणीचे तिन्ही भाषेत (इंग्रजी, मराठी, हिन्दी) संगणकीकरण करण्याचे काम चालू आहे. इंग्रजी चाचणी पूर्ण झाली असून मराठी व हिंदीचे काम करणे चालू आहे.

**संतुलन ओम ध्यान (SOM) परिणामकता प्रकल्प** - ह्या अंतर्गत जर्मनी येथे pre-testing of Experimental group (n= 50) and control group (n= 14) पूर्ण झाले; भारतातील प्रदत्त संकलन रावेत व पुणे या भागातून केले गेले. त्याचे pretest, Interim व Post Test असे दोन्ही गटाचे चाचणीकाम झाले आहे. त्याचे data sorting, coding चे काम पूर्ण झाले आहे.

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**Co Apt टेस्टिंग (१७ आणि १८ मार्च)** - रायपूर येथे नेतृत्व साधना केंद्र येथील ९० विद्यार्थ्यांचे Co Apt टेस्टिंग झाले. या ठिकाणी पूर्ण छत्तीसगड राज्यामधील प्रत्येक जिल्ह्यामधील निवडक विद्यार्थी संपूर्णपणे नि:शुल्क स्वरूपामध्ये स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण घेत आहेत.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**अधिकारी पत्नी बैठक क्र. १३** - आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च रोजी अधिकारी पत्नी गटाची तेरावी बैठक झाली. या बैठकीला सतरा मैत्रिणी उपस्थित होत्या. चेन्नई येथून शिवांजली ननावरे हिने तिच्या एका संशोधन पेपर विषयीची मांडणी केली. यूपीएससीच्या तयारीमध्ये महिलांना विवाहानंतर नवीन घरी स्थिर होणे, बाळंतपणाचा ब्रेक आणि अन्य जबाबदाऱ्या यामुळे अभ्यास चालू ठेवता येत नाही. त्यामुळे याचा विचार करून महिलांसाठी परीक्षा देण्याचे वय वाढवावे अशा प्रकारची मांडणी तिने या पेपरमध्ये केली आहे. हा पेपर डेक्कन क्रोनिकल या मासिकामध्ये प्रसिद्ध झाला आहे.

**सीमावर्ती Mains** वर्ग **(APPSCE)** - सौर फाल्गुन २ (२१ फेब्रु.) रोजी ''How to plan for last 45 days'' या विषयावर एक सत्र झाले. वा. विवेक कुलकर्णी यांनी planning, practice, revision या study methods मधील विषयांवर या सत्रात मार्गदर्शन केले. या सत्रानंतर वा. सविताताई कुलकर्णी यांनी इटानगर येथे नियोजित केलेल्या Offline Guidance आणि one - to - one evaluation वर्गाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. केंद्रातील शिक्षक श्रीमती साक्षी देऊळवार या इटानगरला Offline Guidance वर्गासाठी गेल्या होत्या. तिथे आठवडाभर सौर फाल्गुन १२ ते १८ (३ ते ९ मार्च) त्यांनी एकूण सोळा विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला आणि मार्गदर्शन केले. मार्गदर्शन वर्गाव्यतिरिक दिनांक ८ मार्च रोजी साक्षीताईंनी अरुणाचल मधील डोईमुख महाविद्यालयात जाऊन ३० विद्यार्थ्यांची Co-Apt चाचणी घेतली.

**विशेष** - अरूणाचल प्रदेश मधील पुण्यात शिकत असलेल्या नऊ विद्यार्थ्यांनी आपल्या केंद्रात येऊन Co-Apt Test दिली. अहवाल तयार झालेले असून विभाग प्रमुख वा. सविता कुलकर्णी समुपदेशन सत्रे घेतील.

**दीपस्तंभ मनोबल विद्यार्थ्यांसाठी Co Apt चाचणी** - पुण्यामध्ये दीपस्तंभच्या मनोबल या उपक्रमामध्ये अनाथ अंध अपंग आणि मूकबधिर अशा विविध प्रकारच्या ३९ विद्यार्थ्यांची Co Apt चाचणी घेतली होती. या सर्वांचे अहवाल तयार करून विद्यार्थ्यांना पाठवून दूरस्थ समुपदेशन वा. सविता कुलकर्णी व डॉ. कौस्तुभ बोंद्रे यांनी घेतले.

- **ओरिसा-छत्तीसगड अधिकारी मेळावे आणि भेटी** - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

**युवा शिक्षण भवन** - ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात चालू असलेल्या वैविध्यपूर्ण कामाचा पुढचा टप्पा 'युवा शिक्षण भवन' चा भूमीपूजन समारंभ झाला. या नवीन इमारतीत आरंभ महाविद्यालय (junior college) आणि अटल सामाजिक नवोन्मेषता केंद्र (Atal Community Innovation Centre) हे दोन महत्त्वाचे प्रकल्प आकाराला येणार आहेत.

**पूर्व प्राथमिक विभाग बालोद्यान उद्घाटन** - निगडी केंद्रातील पूर्व प्राथमिक विभागात नव्याने सुरू होणाऱ्या बालोद्यानाचे उद्घाटन झाले. मा. राजेंद्रजी पवार यांच्या सहकार्यातून पूर्व प्राथमिक विभागात खेळण्यांची बाग उभारण्यात आली.

**ज्ञान प्रबोधिनी, क्रीडाकुल** - निगडी व पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना व आमदार सौ. उमाताई खापरे (विधानसभा परिषद महाराष्ट्र राज्य) यांच्या सौजन्याने पुणे जिल्ह्यातील ८ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी सब जुनिअर ॲथलेटिक्स मैदानी स्पर्धांचे आयोजन ज्ञान प्रबोधिनी निगडीच्या मैदानावर केले गेले.

**अभिनंदन** - पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ आणि पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग गुणवत्ता संवर्धन अभियान २०२४-२५ अंतर्गत 'उपक्रमशील शाळा' पुरस्कार यात विद्यालयाला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

कै. देवीदासराव कुलकर्णी स्मृती ऑनलाईन राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेतील शालेय (५वी ते १०वी) गटात विद्यालयाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन, पुणे  व मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी आयोजित राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धेत गुरुकुलाने प्रथम क्रमांक व अभिवाचन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र

**कृषी विद्यालय :** द्वितीय वर्षाच्या सर्व मुलांच्या कृषी आधारित उद्योगाच्या अभ्यास भेटी इटकळ ता. तुळजापूर येथील मोनिका कोंबडी खत निर्मिती उद्योग आणि कुक्कुटपालन (लेअर फार्मिंग) उद्योग, महाबीज बीज प्रक्रिया केंद्र, आणि याचबरोबर उद्योजकांच्या भेटी झाल्या. पुणे येथील कृषी महाविद्यालयात सुरू असलेल्या शाश्वत शेतीच्या पिक प्रात्यक्षिक प्रदर्शनाला चार शिक्षकांनी भेट देऊन उपयुक्त माहिती मिळवली.

**गावसमूह :** हराळी गाव समूहातील पांढरी, द.जेवळी, उदतपुर व फनेपुर येथील ग्रामस्थांच्या भेटी झाल्या. सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची त्यांना सविस्तर माहिती दिली. ढोकी गाव समुहातील कावळेवाडी, बुक्कनवाडी, गोवर्धनवाडी, गोरेवाडी येथील लोकप्रतिनिधी व परिचित व्यक्तींच्या भेटी झाल्या.पांढरी येथील प्रतिसादी ग्रामस्थांची बेठक झाली. शिवनगर व द. जेवळी येथे विविध प्रकल्पांचे गाव स्तरावर कार्य करीत असलेल्या स्थानिक समन्वयकांची मासिक बैठक  झाली. अलुरवरा प्रकल्पातील पाण्याची गुणवत्ता या अंतर्गत शिरसाव, ता. परंडा येथे लोकप्रतिनिधी, महिला प्रतिनिधी व ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या. हराळी गाव समूहातील फनेपुर, पांढरी, द. जेवळी, शिवनगर व उदतपुर येथे शाळा पूर्व तयारीचे इ. १ली च्या वर्गात प्रवेश होणाऱ्या मुलांसाठी स्थानिक व्यक्तींना प्रशिक्षण देऊन वर्गाची सुरुवात करण्यात आली.

उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये १५ हजार लिटर क्षमतेच्या फेरोसिमेंट तंत्रज्ञानाचा वापर करून पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झाले. यात सांगाडा उभा करण्यासाठी शाळेतील २८ मुलांनी श्रमदान केले. पालक, शालेय समितीमधील महिला सदस्य, शिक्षिका व उमरगा शहरातील सामाजिक जाणीव असलेल्या महिला अशा २६ महिलांनी टाकी लिंपण्याचे श्रमदान केले.

दुर्धर आजार प्रकल्पाच्या माध्यमातून हराळी गाव समूहातील पाच गावांतील ३२ रुग्णांच्या भेटी झाल्या. यावेळी रुग्ण्यांच्या गरजांचा आढावा घेण्यात आला. स्थानिक गटाला (वेद्य, समुपदेशक, नर्स व सामाजिक कार्यकर्ते) आदरणीय वनिताताई पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

**अभिनंदन –** गेल्या महिन्याभरापासून चाललेल्या '' मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'' अंतर्गत तपासणीमध्ये आपल्या विद्यालयाने मावळ तालुक्यात सर्व शाळांमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महाशिवरात्र – विद्यार्थ्यांना संस्कृती व कौशल्यांचा अनुभव यावा या उद्देशाने महाशिवरात्रीच्या दिवशी इयत्ता पाचवी ते अकरावीचे २५ विद्यार्थी व पाच शिक्षक यांनी घोराडेश्वर डोंगरावर महाशिवरात्र साजरी केली. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सुरेख अभंग गायन करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी बेल, पान-फुल व बेलाची रोपे विकून तसेच इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी फॅशन डिझाईनिंगच्या अंतर्गत तयार केलेल्या पर्सची विक्री करून विक्री कौशल्याचा अनुभव घेतला.

**विज्ञान दिन –** टाटा टेक्नॉलॉजी अंतर्गत न्यू इंग्लिश स्कूल हिंजवडी येथे एकूण दहा शाळांचे विज्ञान प्रदर्शन भरले होते. या प्रदर्शनासाठी आपल्या विद्यालयातील बारा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या प्रदर्शनात विद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

### ❖ अंबाजोगाई विस्तार केंद्र

**बालशिक्षण परिषद –** सौर फाल्गुन १० (१ मार्च) रोजी अंबाजोगाई येथे स. १२.०० ते दु. ३.०० या वेळेत ज्ञान प्रबोधिनी सोलापूर पूर्व प्राथमिक विभागातर्फे बाल शिक्षण कृतिसंशोधन परिषद झाली. या परिषदेत अंबाजोगाई परिसरातील दहा शाळांमधील ३५ जण व अंबाजोगाई केंद्रातील पाच शिक्षिका असा एकूण ४० जणांचा गट उपस्थित होता. 'कारक विकास होण्यासाठी कृतीयुक्त अनुभवातून विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल' या विषयांचे अनुभवकथन तसेच सणसमारंभाच्या माध्यमातून शब्दसंग्रह वाढीसाठी केलेले प्रयत्न यांचे अनुभवकथन उपस्थित गटासमोर करण्यात आले.

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

**विद्याव्रत तासिका –** प्रज्ञा शाळा, फुरसुंगी येथे आठवीचे दोन वर्ग मिळून ८० विद्यार्थ्यांसाठी दर पंधरा दिवसांनी तासिका होते आणि महिन्यातून एक व्याख्यान घेतले जाते. या महिन्यात बौद्धिक विकसन या विषयावर दोन-दोन तासिका आणि व्याख्यान झाले. दल, अभ्यासिका, आनंदी शिक्षणाचे वर्ग आठ वस्त्यांमध्ये मिळून १४८ मुलांसाठी शनिवार, रविवार घेतले जातात. चार केंद्रांच्या सहली झाल्या. बालविकासचे वर्ग चौदा वस्त्यांमध्ये मिळून २४० मुलांसाठी चार वेळा घेतले.

### ❖ विस्तार कार्यदिशा

**विस्तार कार्य प्रदीर्घ बैठक –** विस्तार कार्यदिशेतर्फे दरवर्षी सर्व केंद्रांसाठी मध्यवर्ती स्तरावर एकदिवसीय प्रदीर्घ बैठक होते. वाढते काम व केंद्रांच्या गरजा पाहून या वर्षी तीन ठिकाणी प्रदीर्घ बैठक घेण्याचे निश्चित झाले. १) मुंबई / कोकण विभाग, २) पुणे व नाशिक विभाग व ३) छ. संभाजीनगर विभाग. त्यापैकी कोकण विभागाची एकदिवसीय प्रदीर्घ बैठक  सौर २५ फाल्गुन (दि. १६ मार्च) या दिवशी बदलापूर येथे झाली. या बैठकीसाठी एकूण २९ जण उपस्थित होते.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा

स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेतर्फे आधुनिक नवरात्र काळात दरवर्षी एक विषय घेऊन अभ्यास केला जातो. या वर्षी 'कुटुंब संस्था' हा विषय घेऊन विविध केंद्रांवरील सदस्यांनी काही अभ्यास तसेच कृती उपक्रम केले. या सर्वांचे एकत्रित सादरीकरण सौर १० फाल्गुन (दि. १ माच) रोजी दु. ४ ते ६ या वेळात दूरस्थ पद्धतीने झाले. प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवरील ५२ सदस्या यावेळी उपस्थित होत्या.

(पान क्र. ७ व ८ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)

# सौर फाल्गुन १९४६ मधील प्रकाशचित्रे


ज्ञान प्रबोधिनी हराळी - आ. लताताई श्रद्धांजली सभा


छोटे सायंटिस्टस् प्रकल्प
Out of the Box कार्यशाळा


ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे - विद्याव्रत संस्कार


Co Apt टेस्ट - नेतृत्व साधना केंद्र - रायपूर


ज्ञान प्रबोधिनी निगडी - क्रीडाकुल क्रीडास्पर्धा


आभासी प्रयोगशाळा उद्घाटन-मनकोट


ज्ञान प्रबोधिनी सोलापूर - प्राणायाम वर्ग




शैक्षणिक साधन केंद्र -निसर्गमित्र ऑलिंपियाड



शैक्षणिक उपक्रम संशोधिका - गणित प्रभुत्व परीक्षा आयोजन



स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण - कातकरी विकास प्रकल्प




प्रेरणा सेतू - Armed Forces या विषयावरील सत्रातील क्षणचित्र



ओरिसा-छत्तीसगड अधिकारी भेटी दौरा



ज्ञानसेतू प्रकल्प - विज्ञान व गणित प्रदर्शन प्रात्यक्षिक



ज्ञान प्रबोधिनी हराळी : प्रदेशविकसन